

शैक्षणिक संदर्भ अंक १२० ऑक्टो-नोव्हे २०१९



# मुली

लेखक : मृणाल पांडे अनुवाद : यशश्री पुणेकर



# मुली

**लेखक : मृणाल पांडे** **अनुवाद : यशश्री पुणेकर**

ज्यादिवशी आम्ही आईबरोबर आजीकडे जाणार होतो त्यादिवशी बाबांनी एक माठ फोडला, चुकून का मुद्दामून ते काही कळलं नाही. ठक्क! सगळीकडे पाणीच पाणी झालं. आईने साडी वर धरून पाण्यात पाय टाकत शेजारच्या खोलीत कान देऊन ऐकत बसलेल्या सरूच्या आईला हाक मारली. "अगं हे जरा पुसून घे. सगळं पाणी सांडलंय बघ. आता यात अजून कोणी पाय घसरून पडलं आणि हाडबिड मोडलं तर नसतं संकट उभं राहायचं."

आईला तर नेहमी सगळ्याच गोष्टीत शेवटी काहीतरी संकटच दिसायचं. सारखी कटकट वाटायची तिला. आम्ही घरी असलो तरी कटकट, शाळेत गेलो तरी कटकट, आजारी पडलो

तरी कटकट आणि चांगले धडधाकट खेळत असलो तरी कटकट. फरशी पुसताना सरूच्या आईने मान जराशी तिरकी करत आईला विचारलं, " यावेळी तीन महिने तरी राहणं होईल ना?" यावर आई मांडीवर जोर देत उकिडवं बसत, म्हणजे तिची हल्ली अशीच बसायची सवय झाली होती, म्हणाली, "हो. त्याच्या आधी ते थोडंच सोडणार आहेत मला? जा गं, बाहेर खेळ जा." मी नेमकी चुकीच्या वेळेला चुकीच्या जागी टपकत असे त्यामुळे ही शेवटची सूचना माझ्यासाठी!

माठाचा एक तुटलेला तुकडा पटकन उचलून बाहेर जाताजाता मी ऐकलं, आई सरूच्या आईला म्हणत होती, "यावेळी मुलगा झाला तर ते लोक तरी सुटतील. पुन्हा पुन्हा हीच कटकट!" सरूची आई नेहमीप्रमाणे मान हलवत म्हणाली असेल, "हो ना, हो ना."

रेल्वेत मी भांडून खिडकीकडची जागा मिळवली आणि इतरांना जीभ काढून ईSSS असं वेडावून पण दाखवलं. पण आई माझ्याकडे बघतीय हे दिसताच मी इ इ इडलिंबू असं म्हणायला सुरुवात केली. पण यावेळी आईचं माझ्याकडे लक्ष नव्हतं. तेव्हा तिच्यासमोर अनेक वेगळ्याच कटकटी होत्या. इकडे तिकडे पसरलेलं सामान, डगमग हलणारा माठ, अशक्तपणा आणि आम्ही तिघी! एका स्टेशनवर खूप तिखट सामोसे घेतले. मी खाणार तेवढ्यात शेजारच्या खिडकीतल्या बाईने तिच्या बाळाला खिडकीतून बाहेर शू करायला लावली. मला तर किळसच आली. मला तो सामोसा खाववेना. मी तो आईला देऊन टाकला. उकडलेल्या बटाट्याचा एक तुकडा सीटवर पडला होता त्याचा किडा बनवला आणि छोट्या बहिणीला घाबरवलं. मज्जा आली, पण तिने भोकाड पसरलं आणि आईने मला धपाटा घातला. मग मी पण रडले. मोठी बहीण म्हणाली

“काय कटकट आहे!” मोठी बहीण खूप मायाळू आहे. तीच एकटी प्रेम करते, बाकी कोणी नाही. सगळे वाईट आहेत.

स्टेशनवर मामा न्यायला आला होता. मी मामीच्या शेजारी बसले. मामी पान चघळत होती. तिच्या कानातले माणिक वरखाली होत होते. ड्रायव्हर जेवढ्या वेळा हॉर्न वाजवी तेवढया वेळा आम्ही तिघी जोरात ओरडायचो… पोंSSS ! ड्रायव्हर खूप हसायचा. घरी गेल्यावर त्याने मला आणि छोटीला कडेवर घेऊन जीपमधून उतरवलं. उतरताना माठ परत हिंदकाळला आणि पाणी सांडलं. मला बाबांची आठवण झाली. मी छोटीच्या चपलेवर जोरात पाय दिला. ती पडता पडता राहिली. “कटकटीचं मूळ” आई दात दाबून पुटपुटली. तिने माझा खांदा पकडून इतरांना असं दाखवलं की मला सावरतीय पण मला इतकं जोरात दाबलं की खांदा दुखायला लागला. आजीकडे आलं की असंच होतं. बाबा तर आमच्याबरोबर येतच नाहीत आणि आई पण आल्या आल्या मावशा, माम्या, आजी आणि जुन्या मोलकरणींमध्ये गायब होऊन जाते. दिवसा तिच्याजवळ जायचं म्हटलं तर कोणी तरी हटकतंच, “अगं इथे तरी तिला आराम करू दे”. आईपण असा गरीब चेहरा करते की, जणू काही आम्ही तिला खातच असतो.

हट! आजीकडे येऊन चिडचिड व्हायला लागली. घरात जायच्या आधी मी झाडांपाशी मुद्दाम रेंगाळले. एक झिपरं कुत्र आलं, त्याने माझा वास घेतला. तेवढ्यात कोणीतरी आतून माझं नाव घेऊन म्हणालं “ही कुठे मागे राहिली आता.” मग कुत्रा आणि मी दोघं एकदमच घरात गेलो. आजी मामाच्या मुलाला मांडीवर घेऊन बसली होती. तिने कुत्र्याला हाड हाड केलं तसा तो बिचारा निघून गेला. मला म्हणाली, “पाया पड, अsssश्शी! मुलीच्या जन्माला आलीयेस.

आयुष्यभर खाली मान घालून राहावं लागेल, तर आत्तापासूनच शिकून घे.” माझ्या पाठीवर हात फिरवत आजी म्हणाली, “ऊं हु! हिची उंची अजिबातच वाढली नाही. कोण म्हणेल हिला आठ वर्षांची!” मी मामाच्या मुलाला थप्पड मारली. तो मुर्खासारखा तरीसुद्धा माझ्या मागे मागे फिरत राहिला. छान होता... गोरा गोरा... जेमतेम पाच वर्षांचा असेल पण सात वर्षांचा वाटत होता. त्याची उंची जरा वयाच्या मानाने जास्तच होती. “रात्री गोष्ट सांगशील?” त्याने मला विचारलं. मी जोरात नाही असं सांगून खोटं खोटंच वर्तमान पत्र वाचायला घेतलं.



“काय कटकट आहे!” आई म्हणत होती. आणि शेजारची आजी म्हणाली, “लालीच्या आई, या वेळेला लालीला नक्की मुलगा होणार. चेहरा बघा तिचा, कसा पिवळा पडलाय. मुलींच्या वेळेला कशी लाल गुलाबी दिसायची.” “काय माहिती... या वेळी पण...” आईने बापुडवाणा चेहरा केला आणि नखं कुरतडू लागली.

मला बाबांची खूप आठवण आली. त्यांच्या अंगाला काय मस्त वास यायचा! आणि त्यांचं पोटही छान मऊ मऊ होतं. त्यांच्या कुशीत झोपायला मज्जा यायची. इथे आई फार वेळ जवळ झोपू देत नाही, म्हणते, “चल, उठ. अंग खिळखिळं केलंस माझं. आणि साडी किती विस्कटलीस! एक तर किती काम पडलंय आणि ही अजून एक कटकट...उठ.” आजी वर बघत

हात जोडत म्हणते, “ हे देवी, आता तूच माझी लाज राख. यावेळी ही माहेरातून जाताना मुलाला घेऊन जाऊदे.” आणि मग डोळे पुसते.

------------------------

मी पांघरुणातून डोकावून पाहिलं तर माझ्या बहिणी झोपल्या होत्या. मी जिथे झोपले होते तिथे भिंतीवर एक मोठं टिकटिक करणारं घड्याळ लावलेलं होतं. सगळे दिवे बंद आहेत. फक्त चंद्राचा उजेड पडलाय. तुळसादाई आईच्या पावलांना तेल चोळत म्हणतेय, “या वेळी मुलगा झाला तर चंदेरी जरीची साडी घेणारे मी, सांगून ठेवते.”

चांदण्यात आईचा चेहरा काही दिसत नाही, फक्त गोलमटोल पोट दिसतंय. आईची साडी सरकलीय. तुळसाने नेमकं वर्मावर बोट ठेवल्याने ती हलक्या आवाजात पुटपुटतीय, “या वेळी मुलगा झाला तर ठीक....सुटेन मी.” मग तुळसाला सांगते, “जा आता तू. तुझी मुलं वाट बघत असतील. आणि तेलाची वाटी खाटेखाली नीट आत सरकवून ठेव. नाहीतर सकाळी मुलं उठली की कोणाचा तरी पाय लागून तेल सांडेल... चांगलं नाही ते.” आईने अर्धवट सोडलेलं बोलणं बराच वेळ खोलीत तरंगत राहतं, घड्याळाच्या टिकटिकी सारखं.

चांगली गोष्ट नेहमी पूर्ण बोलतात हे मोठे लोक पण वाईट गोष्ट नेहमी अर्धवट...असं का? ‘काय बायकांचं नशीब....’ गप्प…... ‘अरे तीन तीन मुली..’ गप्प…..

बाहेर एक चांदणी खूप चमचम करत होती. बहुतेक तो ध्रुव तारा असेल. बाबा म्हणतात, “मन लावून शिकलीस तर तू सुद्धा तुला हवं ते होऊ शकतेस, ध्रुव ताऱ्यासारखं.” “मुलगा नाही

होऊ शकत ना पण...” मी धीटपणे असं म्हटलं तर माहीत नाही का पण बाबा एक रपाटा घालतात आणि म्हणतात, “मोठ्यांना उलट उत्तर देतेस?” मोठ्या माणसांचं काही कळतच नाही. मोठी बहिण म्हणते, “मोठ्या माणसांवर कधी विश्वास ठेवू नये. ती आपल्याला अगदी खोदून खोदून विचारतात पण स्वतःचं मात्र काही सांगत नाहीत.”

ते आम्हाला काहीच सांगत नाहीत. इकडे, विशेषतः रात्री जेव्हा आम्ही झोपतो तेव्हा मोठ्या लोकांची वेगळीच दुनिया उघडते, एखाद्या बंद पेटाऱ्यासारखी! मी जागून ऐकायचा प्रयत्न करते पण कशी कोण जाणे मला नेमक्या वेळेला झोप लागते.



हा कोणाचा आवाज आहे? हमसून हमसून हुंदके देतीय ती छोटी मावशी आहे का? “दारच्या कुत्र्याएवढी पण किंमत नाहीये मला त्या घरात.” ती आईजवळ बसून रडकथा सांगतेय. पण कोणत्या घरात? मला विचारायचं होतं. आई म्हणते, “आमचा जीव पण खालीवर होतो गं. पण तसंच निभावून न्यायचं.” मला झोप यायला लागते.

मी सकाळी आईला विचारते, “निभावून न्यायचं म्हणजे काय गं आई?” सगळे नाष्टा करतायत. “म्हणजे छोटी मावशी म्हणते ते निभवायचं.” आई एक धपाटा घालते. मग आणखी एक घालणार तितक्यात मामी सोडवते, “जाऊदे ना.

लहान आहे अजून.'' ''काही लहानबिहान नाही. आखाडसासू आहे माझी.'' रागाने आईचं पोट थरथरायला लागलं, ''चोरून मोठ्यांच्या गप्पा ऐकते. हिचं कसं होईल देव जाणे.''


''तू पण ना....'' बाहेर हौदाजवळ फुलं वेचत असलेली मोठी बहीण म्हणते, ''कितीवेळा सांगितलं तुला? सारखे अबरचबर प्रश्न विचारत जाऊ नकोस. जास्त प्रश्न विचारशील तर ठोकून ठोकून मारून टाकतील ते लोक तुला.'' मी रडत रडत म्हणते, ''मी विचारणार...मी विचारणारच, खूप प्रश्न विचारणार.'' ती म्हणते, ''मर मग.'' मग ती समजूतदारपणे आजीच्या गोपालकृष्णासाठी फुलांचा हार ओवायला घेते. ''ही माझी लाखात एक लक्ष्मी आहे,'' आजी तिला म्हणत नेहमी मला हे ऐकवते.

------------------------

दुपारी मी छोट्या मुलांना भीतीदायक हडळ आणि भुतांच्या गोष्टी सांगते. ''ही भूतं खालच्या आक्रोडाच्या झाडावर राहतात. अमावास्येच्या रात्री बारा वाजता तिथे गेलं ना तर ती रक्ताने अंघोळ करताना दिसतात. नाकाने बोलतात ती माहितीय का… नाकाने… काय बोलतात काही कळतच नाही.'' मुलं दिवसभर माझ्या मागे मागे फिरत राहतात. जणू जादूगाराच्या मागे उंदीर!

दुपारी मोठी मामी आणि आई आम्हाला चिंचेची गोळी खायला पैसे देतात आणि बाहेर पिटाळतात. त्यांच्या खोलीच्या खिडक्यांना हिरवा कागद चिकटवलाय, नुसता अंधार! माम्या, मावश्या, आई, आजी सगळ्या बायका त्या एकाच खोलीत. त्यांचे पैलवानासारखे दंड, उघडे

पडलेले जाड जाड पाय, घेरदार पोटं... आम्हाला सांगतात पाय पसरून बसू नका...पाय उघडे टाकू नका... आणि स्वतः बघा... हुं !



"तुम्ही सगळ्या कळपातल्या गायींसारख्या दिसताय." मी हे म्हटलं तर कोणी ऐकलंच नाही. जमिनीवर उशी टाकून झोपलेल्या छोट्या मावशीने आमच्याकडून चिंचेची गोळी घेतली आणि चोखत चोखत म्हणाली, "कमाल आहे बाई दाजींची" यावर सगळ्या जणी जोरात हसल्या. कोण? का? कसं? मी सगळ्यांकडे उत्तरासाठी बघते पण कोणाचं आमच्याकडे लक्षच नाहीये. त्या पुन्हा आपसात बोलण्यात दंग झाल्यात.

मग मी बाहेर जाऊन दरवाजा जोरात आपटते. आता आई येऊन म्हणेल, "काय कटकट आहे" पण आतलं कोणीच माझी दखल सुद्धा घेत नाहीत.

"सरक." डोकं हलवत हरीची आई म्हणते, "सरक हे तुमच्यासाठी नाहीये. मोठ्या माणसांसाठी आहे." तिच्या हातात चहाच्या कपांनी भरलेला ट्रे आहे. तो घेऊन ती बायकांच्या खोलीत जाते. तिचं नाक बेडकासारखं आहे आणि नाकाच्या वर भुवया एकमेकीला जुळलेल्या आहेत. ती हसते तेव्हा मेलेल्या वटवाघळासारखे तिचे गाल खाली लटकतात. "सरक गं" ती

पुन्हा म्हणते. “नाही सरकणार.” मी पण अडून बसते. “आधी म्हण - मुली खूप चांगल्या असतात.” “हो हो म्हटलं. चल.” ती म्हणते. मी म्हणते, “नाही नीट म्हण, मी सांगते तसं.”

“काय चाललंय हरीची आई?” आतून मावशी चिडक्या आवाजात ओरडते, “चहा काय पुढच्या वर्षी देणारेस का?” हरीच्या आई जुळलेल्या भुवया माझ्यावर रोखून म्हणते, “आणते ताई. ही मधली मुलगी बघाना...” हसल्यावर तिचं नाक बेडकासारखं फुरफुरतं. आतून आई माझं नाव घेऊन म्हणते, “हीच कार्टी छळत असेल तिला. एक दिवस माझा जीव खाणारे ही पोरगी.” “अशा स्थितीत चिडचिड करू नये गं.” कोणीतरी समजावतं.

मग मी अंगणात बसून उडणाऱ्या चिमण्यांचा खेळ पाहत राहते. मला वाटलं मी चिमणी का नाही झाले? आई चिमण्या पण त्यांच्या मुलींना अशाच वाईट समजत असतील का?

“आता ही कुठे गेली?” कोणीतरी माझ्या नावाने आतून हाक मारत बाहेर येतं. पण मी पटकन दाराच्या मागे लपून बसते, दिसू नये म्हणून. कुठूनतरी ती जादूची सुपारी मिळाली पाहिजे. ती तोंडात ठेवली की हवं तेव्हा अदृश्य होता येतं. मग मज्जाच मज्जा!

------------------------

रात्री गोष्ट संपवून आजी म्हणते, “जा आता झोपा.” छोटी बहीण तर आधीच झोपलीय. तिला हरीची आई कडेवर उचलून आत नेते. मी आजीला विचारते, तुझ्याजवळ झोपू का? आजीचं अंग मऊमऊ आणि लुसलुशीत आहे. तिच्या रजईला वेलदोडा आणि लवंगेचा वास येतो. तिच्या उशाखाली एक बॅटरी असते. रात्री दिवे नसताना बॅटरी घेऊन बाथरुमला गेलं की

पायाचा अंगठा ठेचकाळत नाही. मामाच्या झोपलेल्या मुलाला जवळ ओढून आजी म्हणाली, “नको गं बाई. आधीच हा माझ्याशिवाय कोणाजवळ झोपत नाही आणि मी कुठे दोघा दोघांना घेऊन झोपू. जा तू आईजवळ झोप. उद्या पुन्हा गोष्ट सांगेन हं.”


आजीचा आवाज लाडीगोडी लावल्यासारखा झालाय. खोलीत गेल्यावर “झोपवलं का तुला जवळ” माझ्याकडे वळून न बघता मोठी बहिण म्हणाली. तिचा स्वर रागाने थरथरत होता. घड्याळाची टिकटिक चालू आहे. आई घोरतीय आणि.... झोपवलं का? झोपवलं का?....टिकटिक ....खर्र खर्र.....

------------------------

“कुठे आहात गं मुलींनो?” आजी ओसरीवरून हाक मारतीय. तिच्या हातात पूजेची थाळी आहे. समोर कढईत शिरा आणि शेजारी गरमगरम पुऱ्या. आज अष्टमी आहे. आजीच्या समोर चटई अंथरलीय. आरतीच्या ताटात आजीने कपूर लावलाय. “या गं, तुमची पूजा करते.” माझ्या दोघी बहिणी आणि मामाच्या सुंदर मुली तिच्या समोर बसल्यात. आजी त्यांना हळदकुंकू लावते, अक्षता लावते. घंटा वाजवते आणि मग रेल्वेच्या भोंग्यासारखा शंख वाजवते, पूSSS !

मी इंजिन होऊन अंगणात गोल गोल चक्कर मारतीय. खोलीत वास आहे, कापराचा, शिऱ्याचा, तुपाचा, फुलांचा.... “द्या द्या पैसे द्या... कलकत्त्याला जाऊया ..पू...पू...”

“अगं ये. तुझी पण पूजा करते. तू तर माझी कन्याकुमारी आहेस.” आजी बोलावते. मी म्हणते, “नाही, मी तर इंजिन झालेय.” हे म्हणत असतानाच भीतीने माझ्या पोटात गोळा येतोय.



आई धडपडत माझ्याकडेच येतीय. “चल मी करते तुला इंजिन...आता बघतेच तुझ्याकडे” आईचा चेहरा रागाने लाल झालाय.

“बास झालं लाली.” शेजारची आजी आईचा हात धरत मला डोळ्याने आईचं ऐकण्याविषयी खुणावते. “लहान आहे अजून. कन्याकुमारी आहे ती. आज अष्टमी आहे. देवीचा दिवस. आजच्या दिवशी देवीला असं मारत नाहीत.”


मी धपकन उडी मारून सटकते. आई रडतीय आणि आजी वाकडं तोंड करून मुलींना शिरा पुरी वाढायला लागते.

“जा ना. का रडवतेस आईला अशावेळी?” चिडकी मावशी म्हणते.

“तुम्ही मुलींवर प्रेमच करत नाही मग ही खोटी खोटी पूजा तरी कशाला करता?” माझा आवाज रडवेला होतो. रागाने मला कसंतरी होतंय. असं वाटतंय तो जळता कापूर गिळावा आणि ह्या धोकेबाज गळयाला जाळून टाकावं.

“का?” मला पुन्हा विचारायचंय पण रडू येईल या भीतीने मी गप्प बसते. मला नाही रडायचं, या लोकांसमोर तर नक्कीच नाही.

हरीची आई तोंडावर हात ठेवून म्हणते, “आई आई गं. ऐका हिचं बोलणं. मुलगी असून इतका राग!”



आजी मुलींना सव्वा सव्वा रुपया देतीय. “सव्वा रुपयात वीस चिंचेच्या गोळ्या येतात, आण्याला एक.” असं म्हणून आजी माझ्यापुढे रुपयात गुंडाळलेली चवली धरते. तिच्या अंगठ्याच्या टोकावर थाळीचा वळ रक्ताच्या डागासारखा दिसतोय.

मी भिंतीकडे सरकत म्हणते, “मला नको ही बायकांची शिरा पुरी, पूजा आणि रुपया.” “मला देवी व्हायचं नाहीये.” मी इतक्या जोरात ओरडते की अंगणात दाणे टिपत असलेली कबुतरे घाबरून फडफड करत उडून जातात, जणू काही एखादी गोळीच लागलीय.

*हिंदी शैक्षणिक संदर्भ १२१ मधून साभार.*

§§§

---

लेखक : **मृणाल पांडे**, पत्रकार,लेखक आणि टेलीव्हिजनवर कार्यरत, पद्मश्री सन्मानित

चित्र : **शिवांगी सिंह**, दिल्ली येथील चित्रकार

अनुवाद : **यशश्री पुणेकर,** शैक्षणिक संदर्भ गटात सहभागी

इमेल : yashashreegpunekar@gmail.com